स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्ताने

जनता शिक्षण संस्थेचे

# किसन वीर महाविद्यालय, वाई

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

आणि

# अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती, शाखा सातारा

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## दोन दिवसीय राष्ट्रीय विज्ञान परिषद

# वैज्ञानिक दृष्टिकोण : सामाजिक जाणीवजागृती



# अनुक्रमणिका

## भाग १ : मान्यवरांची भाषणे


| | | |
|---|---|---|
| १ | डॉ. आ. ह. साळुंखे - उद्घाटन भाषण | १५ |
| २ | ॲड. कोळसे-पाटील - उद्घाटन सत्राचे अध्यक्षीय भाषण | २३ |
| ३ | डॉ. अनिमिष चव्हाण - अंधश्रद्धेचे मानसशास्त्र : उपचार आणि उपाय | ३३ |
| ४ | डॉ. मंगला नारळीकर - वैज्ञानिक दृष्टिकोणावर आधारित अभ्यासक्रमाची आवश्यकता | ४० |
| ५ | डॉ. भारत पाटणकर - भारतीय संस्कृती आणि अंधश्रद्धांची उत्पत्ती | ४९ |
| ६ | प्रा. श्याम मानव - अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ आणि वैज्ञानिक दृष्टिकोण | ६१ |


## भाग २ : शोधनिबंध

### इंग्रजी


| | | |
|---|---|---|
| 1. | Dr. Sunil Sawant - Fostering Scientific Temper to Sustain the Clear Stream of Reason | ७७ |
| 2. | Dr. Shivaji Pandurang Kamble - "Role of Education in Developing Scientific Temper in Students" | ८१ |
| 3. | Dr. Shivaji Tate - Impact of Superstition on Indian Society | ९१ |
| 4. | Rahul Hanmant Waliv - A Case of Gender Violence Under the Mask of Vigilantism in India: Witch Hunting | ९९ |


### हिंदी


| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. सोनकांबले अरुण अशोक - संत कबीरकी वाणीमें वैज्ञानिक दृष्टी | १०९ |


### मराठी


| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. गणेश विष्णू लोखंडे - मनोविकृतींच्या निदान आणि उपचारातील अधंश्रद्धांचा व्यत्यय | ११५ |
| २. | डॉ. मंजूषा इंगवले - महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या अंधश्रद्धांचा चिकित्सक अभ्यास | १२३ |
| ३. | डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात - अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील शाहीर विजय जगताप यांचे योगदान | १३२ |

## २. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या अंधश्रद्धांचा चिकित्सक अभ्यास

**डॉ. मंजूषा इंगवले**
वनस्पतिशास्त्र विभाग,
किसन वीर महाविद्यालय, वाई

### १. सारांश :

रोज समाजातील घटना पेपरमध्ये वाचून असे लक्षात येते, की आजही समाजात अंधश्रद्धा व भोंदूगिरीचे प्रमाण वाढलेले आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये या विषयाबाबत पूर्णपणे जाणीवजागृती झालेली दिसत नाही. विद्यार्थ्यांमध्ये अंधश्रद्धेबाबतचे सर्वेक्षण केले असता हे प्रकर्षाने जाणवले. महाविद्यालयीन विद्यार्थी म्हणजेच आजचा युवक हा उद्याचा सुजाण नागरिक आहे. विद्यार्थ्यांच्या मनातील श्रद्धा-अंधश्रद्धा बाबतचे सर्व शंकांचे निरसन व्हावे, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोण रुजावा व त्यांच्यामध्ये असलेल्या विविध गुणांचा विकास व्हावा, म्हणूनच प्रश्नावलीच्या माध्यमातून सर्वेक्षण करून सदर विषयाबाबतची असणारी मते विद्यार्थ्यांकडून जाणून घेतली. यासाठी किसन वीर महाविद्यालयातील सायन्स विभागात विद्यार्थ्यांकडून त्याची मते जाणून घेतली. विद्यार्थ्यांमध्ये असलेले गैरसमज समजावून घेतले. विद्यार्थ्यांकडून आलेल्या उत्तरांचे विश्लेषण व त्यावर तयार केलेले स्पष्टीकरण याचा सदर संशोधनपर लेखामध्ये ऊहापोह केला आहे.

**२. बीज संज्ञा** : अंधश्रद्धा, श्रद्धा, गैरसमजाचे स्पष्टीकरण.

**३. प्रस्तावना** : करपेवाडी, तालुका पाटण येथील महाविद्यालयीन विद्यार्थिनी कुमारी भाग्यश्री माने हिची गळा चिरून हत्या करण्यात आली होती. हे साडेतीन वर्षांनी सिद्ध झाले, की हा अंधश्रद्धेचा नरबळी होता. आज आपण वर्ष २०२२ मधील प्रगत विज्ञान व संगणकाच्या युगात जगत आहोत. जिथे मानवाने आधुनिक साधनाने संपूर्ण जगाला एका क्लिकमध्ये एकत्र केले आहे. तरीही आपल्याला अंधश्रद्धेबद्दल सामाजिक जाणीवजागृती करण्याची गरज भासत आहे. अंधश्रद्धा म्हणजे आंधळा विश्वास जो मानवी समाजाला मिळालेला शाप आहे. ज्यामध्ये माणूस आपली विचारशक्ती हरवून बसलेला आहे. त्याचा आजही मंत्र-तंत्र, जादूटोणा, शकुन-अपशकुन, तांत्रिक-मांत्रिक, पुजारी-ज्योतिषी, ग्रह-नक्षत्र यावर पूर्ण विश्वास आहे. अंधश्रद्धा म्हणजे कोणताही विचार न करता एखाद्या गोष्टीवर पूर्ण विश्वास ठेवणे होय. याचे मुख्य कारण म्हणजे त्यांच्या मनामध्ये असलेली भीती, पैसा

न मिळणे व तो झटपट कसा मिळेल अशी अनेक उदाहरणे आहेत, की ज्यात एखाद्या व्यक्तीला प्रचंड असुरक्षित वाटते. ही भीती आपल्यात अंधश्रद्धेची बीजे पेरते आणि ही अंधश्रद्धा पिढ्यान् पिढ्या सुरू राहते. त्याच वेळी त्याला स्वार्थी व समाजकंटक माणसे खतपाणी घालतात. अशी माणसे बुवा, बाबा, साधू, महंत, तांत्रिक-मांत्रिक यांचेकडून फसली जातात. ही माणसे सहजपणे आपला स्वार्थ साधून घेतात व पैसा कमावतात. या विज्ञानाच्या युगात ही श्रद्धाळू मंडळी बुवांच्या चमत्कारावर विश्वास ठेवतातच कसा हे कळत नाही. याचा अर्थ अंधश्रद्धेचा पगडा आपल्या समाजातून पूर्णपणे गेलेला नाही.

आज तर सगळ्यांच्या हातात मोबाईल आहे. सर्वांचे व्हॉटस् ॲप ग्रुप आहेत. त्यावरती रोज एक संदेश असा असतो, की त्यामध्ये देवतांचा फोटो असतो. सोबत एखादा मंत्र असतो. त्यामध्ये लिहिलेले असते, की हा संदेश १० जणांना पाठवा म्हणजे तुम्हाला आनंदाची बातमी कळेल. पण जर नाही पाठवला तर काहीतरी वाईट घडेल. वाईट घडेल या भीतीनेच तो संदेश १० जणांना पाठवला जातो; अशी आहे सध्याची समाजातील आधुनिक अंधश्रद्धा.

ज्ञान हा बुद्धीचा प्रांत, तर श्रद्धा-अंधश्रद्धा हा मनाचा प्रांत. आपल्या जगण्याचा अर्थ आपल्याला बुद्धी व मन या दोघांच्या समन्वयातून सापडत असतो. जसजसे ज्ञान वाढेल व वैज्ञानिक दृष्टिकोण रुजेल तसतशा अंधश्रद्धा कमी होण्यास नक्कीच मदत होईल.

### ४. हेतू

अंधश्रद्धेविषयी विद्यार्थ्यांमध्ये असणारे गैरसमज दूर करणे.

### ५. उद्दिष्टे

१. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये अंधश्रद्धाविषयक असलेले गैरसमज जाणून घेणे.

२. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये अंधश्रद्धाविषयक असलेले गैरसमज दूर करण्यासाठी त्यावर समर्पक संदर्भासहित स्पष्टीकरण देणे.

### ६. परिकल्पना

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये अंधश्रद्धाविषयक गैरसमज आहेत. त्यावर योग्य ते स्पष्टीकरण मिळाल्यास अंधश्रद्धा दूर होण्यास मदत होईल.

### ७. व्याप्ती व मर्यादा

प्रस्तुत संशोधन हे अंधश्रद्धा संदर्भात आहे, तसेच विद्यार्थ्यांनी प्रश्नावलीला दिलेल्या

प्रतिसादावर निष्कर्ष अवलंबून आहेत. प्रस्तुत संशोधन हे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर कार्यक्षेत्रातील सातारा जिल्ह्यातील वाई तालुक्यातील किसन वीर महाविद्यालय, विज्ञान शाखेमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे.


## ८. संशोधनाची कार्यपद्धती


अंधश्रद्धेविषयी असलेल्या प्रश्नांची प्रश्नावली तयार केली.


### अंधश्रद्धेवर आधारित प्रश्न


१. आत्मा आहे का ?

२. पुनर्जन्म होतो का ?







५

लग्न करताना मुला-मुलीची पत्रिका बघावी का?


होय ५२.२%
नाही ४७.८%




६

गृहप्रवेश व वास्तुशांत करावी का?


होय ७९.१%
नाही २०.९%




७

मांजर आडवे जाणे म्हणजे अपशकुन असे तुम्ही मानता का?


होय ९३.५%
नाही ६.५%




८

मुंगूस दिसणे म्हणजे शुभ असे तुम्ही मानता का?


होय २२.८%
नाही ७७.२%




९

देवावर विश्वास आहे का ?


होय ८८%
नाही १२%




१०

ग्रहाच्या खड्याच्या अंगठ्या घालणे शुभ मानता का ?


होय १२%
नाही ८८%



११

अमावास्या वाईट असते हे खरे आहे का ?


होय ७३.९%
नाही २६.१%




१२

लग्नाला मुहूर्त पाहिला जातो हे योग्य आहे का?


होय ६०.४%
नाही ३९.६%




१३

मृत्यूनंतर केले जाणारे विधी बरोबर आहेत का ?


होय ७०%
नाही ३०%




१४

नवरात्रात वापरले जाणारे वस्त्रांचे रंग हे योग्य आहे का ?


होय ५०%
नाही ५०%




१५

जादूटोणा केल्यानंतर खरंच भरपूर पैसे मिळतात का?


होय ४.३%
नाही ९५.७%




१६

मूर्तिपूजा योग्य आहे का ?


होय ७२.५%
नाही २७.५%



१७

सत्यनारायणाची पूजा घरात केल्यावर शांतता लाभते हे खरे आहे का?


होय ६३.७%
नाही ३६.३%




१८

शनीची साडेसाती कमी होण्यासाठी ग्रहाची शांती करणे योग्य आहे का?


होय २३.३%
नाही ७६.७%




१९

बुवाबाजीवर तुमचा विश्वास आहे का?


होय ५.४%
नाही ९४.६%




२०

पाप-पुण्य खरे आहे का?


होय ७२.५%
नाही २७.५%




२१

नशीब असते का?

होय ७४.७%
नाही २५.३%



३. ग्रहावंर विश्वास आहे का ?

४. लग्न करताना मुला-मुलीची पत्रिका बघावी का ?

५. गृहप्रवेश व वास्तुशांत करावी का ?

६. मांजर आडवे जाणे, म्हणजे अपशकुन तुम्ही मानता का ?

७. मुंगूस दिसणे म्हणजे शुभ असे तुम्ही मानता का ?

८. देवावर विश्वास आहे का ?

९. ग्रहाच्या खड्याच्या अंगठ्या हातात घालायला शुभ असे तुम्ही मानता का ?

१०. अमावास्या ही वाईट असते, हे खरे आहे का ?

११. लग्नाला मुहूर्त पाहिला जातो हे योग्य आहे का ?

१२. मृत्यूनंतर केले जाणारे विधी हे बरोबर आहेत का ?

१३. नवरात्रात वापरले जाणारे वस्त्राचे रंग जसे सोमवार पांढरा रंग हे योग्य आहे का ?

१४. जादूटोणा केल्यानंतर खरच भरपूर रुपये मिळतात का ?

१५. मूर्तिपूजा योग्य आहे का ?

१६. सत्यनारायणाची पूजा घरात करावी म्हणजे शांतता लाभते हे खरे आहे का ?

१७. शनीची साडेसाती कमी होण्यासाठी ग्रहांची शांती करणे योग्य आहे का ?

१८. बुवाबाजीवर तुमचा विश्वास आहे का ?

१९. पाप-पुण्य खरे आहे का ?

२०. नशीब असते का ?

ती गुगल फॉर्मच्या स्वरूपात किसन वीर महाविद्यालयात सायन्स वरिष्ठ विभागात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या व्हॉटस ॲप ग्रुपवर पाठवून दिली व त्यांच्याकडून आलेल्या उत्तराचा अहवाल तयार केला.

**९. नमुना**

प्रस्तुत संशोधनासाठी किसन वीर महाविद्यालय, वाई, ता. वाई, जि. सातारा येथील सायन्स शाखेत शिकणाऱ्या बी.एस्सी. भाग-१,२,३ विद्यार्थ्यांची निवड केली. तो अहवाल पुढीलप्रमाणे आहे. त्याचे स्वरूप खालीलप्रमाणे :-

एकूण विद्यार्थ्यांपैकी १२.२% एवढे विद्यार्थी हे वाई शहरात राहत असून ८७.०८% एवढे विद्यार्थी

हे ग्रामीण भागातील आहेत. ५१.१% विद्यार्थ्यांचा आत्मा आहे यावर विश्वास आहे. ३१.५% विद्यार्थ्यांना वाटते, की पुनर्जन्म होतो. ४७.०७% विद्यार्थ्यांचा ग्रहांवर विश्वास आहे. ५२.०२% मुलामुलींना लग्न करताना पत्रिका बघूनच लग्न ठरवावीत असे वाटते. ७९.१% विद्यार्थ्यांचा गृहप्रवेश व वास्तुशांती यावर विश्वास आहे. ९३.५% विद्यार्थी हे मांजर आडवे जाणे हा अपशकुन मानतात. ७७.२% विद्यार्थ्यांना मुंगूस दिसणे शुभ वाटत नाही, परंतु २२.८% विद्यार्थी मुंगूस दिसणे शुभ शकुन मानतात. ८८% विद्यार्थ्यांचा देवावर विश्वास आहे तर १२% विद्यार्थ्यांचा देवावर विश्वास नाही. ८८% विद्यार्थ्यांचा ग्रहांवर विश्वास नाही, परंतु १२% विद्यार्थ्यांचा विश्वास ग्रहाच्या अंगठ्या परिधान करण्यावर आहे. अमावास्या वाईट असते असे ७३.९% विद्यार्थ्यांना वाटत नाही. ६०.४% विद्यार्थ्यांना लग्न हे मुहूर्तावर करावे असे वाटते. ७०% विद्यार्थ्यांना मृत्यूनंतर वेगवेगळे विधी करणे योग्य वाटते. ५०% विद्यार्थी नवरात्रात असणाऱ्या नऊ रंगाचे वस्त्र परिधान करणे पसंत करतात. ९५.७% विद्यार्थ्यांचा जादूटोणा यावर विश्वास नाही. ७२.५% विद्यार्थी मूर्तिपूजा करतात. २३.३% विद्यार्थी साडेसातीला घाबरतात. सत्यनारायणाची पूजा ६३.७% विद्यार्थ्यांना करावीशी वाटते. ९४.६% विद्यार्थ्यांचा बुवाबाजी पटत नाही परंतु ५.४% विद्यार्थ्यांचा बुवाबाजीवर विश्वास आहे. ७२.५% विद्यार्थ्यांचा पाप-पुण्यावर विश्वास आहे. ७४.७% विद्यार्थ्यांचा नशिबावर विश्वास आहे.

वरील माहिती अभ्यासता अजूनही महाविद्यालयातील सायन्स विभागात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनात अंधश्रद्धा आहेत. पूर्णपणे त्याचे निर्मूलन झालेले नाही. त्यांना मार्गदर्शनाची गरज आहे.

## १०. निष्कर्ष

*१. निराशावादाकडून आशावादाकडे वळण्याचा प्रयत्न केला पाहिजे*

प्रत्येकाच्या जीवनात काही समस्या रोजच येत असतात. त्यामुळे निराश न होता त्या सोडवण्यासाठी आपण प्रयत्नशील राहिले पाहिजे.

*२. विज्ञाननिष्ठ जाणीवजागृती केली पाहिजे*

मानव जन्माला आल्यापासून त्याला निसर्गातील वेगवेगळ्या घटना नवीन व आश्चर्यकारक वाटतात. उदा. भूकंप, सूर्यग्रहण, चंद्रग्रहण, वनस्पतीला बहर येणे, कळीचे उमलणे, पक्ष्यांचे होणारे गुंजन, जन्म व मृत्यू या व अशा विविध गोष्टींचा विज्ञानाच्या दृष्टिकोणातून अभ्यास केला पाहिजे व त्याची समाजजागृती केली पाहिजे.

*३. उत्तम शिक्षण*

विद्यार्थ्यांना विज्ञान दृष्टीने शिक्षण देणे ही गरज झाली आहे. अंधश्रद्धेबाबत माहिती अभ्यासपुस्तकात समाविष्ट केली पाहिजे.

*४. विवेक वाहिनी*

प्रत्येक महाविद्यालयात विवेक वाहिनी ही कमिटी आहे. त्याद्वारे विद्यार्थ्यांना बौद्धिक व विज्ञानाच्या पातळीवर स्पष्टीकरण देणारे व्याख्यान आयोजित करणे आवश्यक आहे.

*५. शिबिर, व्याख्याने व कार्यशाळा यांचे आयोजन करणे*

प्रत्येक महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे गैरसमज दूर करण्यासाठी तज्ज्ञ लोकांचे मार्गदर्शन, वेगवेगळी शिबिरे, जनजागृतीसाठी व्याख्याने तसेच कार्यशाळेचे आयोजन करणे आवश्यक आहे.

माणसाने विज्ञानाची व प्रयत्नवादाची कास धरली पाहिजे. आपले मन सक्षम करणे हेच सर्वात महत्त्वाचे आहे आणि अंधश्रद्धांच्या जळमटांची मनातून हकालपट्टी करावी हेच योग्य ठरेल.

## ११. संदर्भ


१. खंडाईत, विलास (२०२१), जादूटोणाविरोधी कायदा : प्रशिक्षण कार्यक्रम, सातारा : लोकायत प्रकाशन.

२. मानव, श्याम (२०१५). 'बुवाबाजी' : 'बळी स्त्रियांचा' पुणे : मनोविकास प्रकाशन.

३. दाभोळकर, नरेंद्र (२०१४). 'श्रद्धा' : 'अंधश्रद्धा', पुणे : राजहंस प्रकाशन.

४. मानव, श्याम (२००८) 'बुवाबाजी एक फसवेगिरी', पुणे : मानव पब्लिकेशन.

५. मानव, श्याम (२०१४) 'रहस्यभेद भानामतीचा', पुणे : मनोविकास प्रकाशन.

६. मानव, श्याम (२०१५) 'मायाजाळ अंधश्रद्धांचे', पुणे : मनोविकास प्रकाशन.


❒❒❒